**MHKO**070003372018

**नियमित दिवाणी दावा क्र. ५०/२०१८ मधील निशाणी क्र. २४ वरील आदेश**
**(श्री.बापू कृष्णा माने – विरुध्द– श्री.चंद्रकांत बाळासो पाटील आणि इतर )**

अर्ज व त्यासोबत दाखल केलेले दस्तऐवज पाहिले. प्रस्तुत दाव्यातील एकमेव वादी दि.२७/०७/२०२१ रोजी मरण पावला असून दाव्याचा विचार करता त्याच्या वारसांना दावा पुढे चालू ठेवण्याचा अधिकार प्राप्त होतो असे प्रथमदर्शनी दिसते. तसेच मयताच्या वारस क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीत दाखल केला आहे असे ही प्रथमदर्शनी दिसते.

२) असे असले तरी वादी मयत बापू कृष्णा माने याला अर्जदारांव्यतिरीक्त इतरही ३ वारस असून ते दाव्यामध्ये वादी म्हणून समविष्ठ होवू शकत नसल्यामुळे त्यांना प्रतिवादी क्र. ११, १२ व १३ म्हणून समाविष्ठ करावेत अशी विनंती अर्जाद्वारे करण्यात आलेली आहे. मात्र तशी परवानगी दिल्यास प्रतिवादी क्र. ११ ते १३ यांना दाव्यामध्ये का समाविष्ठ करावे याबाबतचा कोणताही मजकूर मुळ दाव्यामध्ये वाढवण्याबाबत विनंती नाही. अशा परिस्थीतीत केवळ अर्जदारांना मयत वादी बापू कृष्णा माने याचे वारस या नात्याने दाव्यामध्ये समाविष्ठ होण्याची परवानगी देणे न्यायोचित होईल असे माझे मत बनते. करीता खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारांना मयत वादी बापू कृष्णा माने याचे वारस या नात्याने वादी क्र. १–अ ते १–ड म्हणून दाव्यामध्ये समाविष्ठ होण्याची परवानगी देण्यात येते.

३. अर्जदारांनी मुळ दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करावी आणि सुधारीत वादपत्र दाखल करावे.

स्वाक्षरीत/–
**(आनंद दे. करभाजन )**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर.

दिनांक – २७/१०/२०२१
ठिकाण – जयसिंगपूर.